माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ९४९/२०२२**

**अपिलार्थी, श्री. संकेतकुमार जगदिशराव डालके,**
**मु. पो. उमरी ममदाबाद, ता. दर्यापूर, जि. अमरावती,**

**विरुध्द**

**उत्तरार्थी : १. जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत उमरी ममदाबाद, ता. दर्यापुर, जि. अमरावती.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, दर्यापूर, जि. अमरावती**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.०५.२०२५**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०७.१२.२०२१ | १२.०३.२०२२ | २८.०१.२०२२ | २१.०२.२०२२ |

१. अपिलार्थी यांनी दि. **२३.०३.२०२२** रोजीच्या अर्जान्वये "*प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेश करुन सुध्दा माहिती अपुर्ण स्वरुपाची दिली.*" असे कारण नमूद करुन कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर दिनांक २२.०५ २०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री. संकेतकुमार जगदिशराव डालके उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. संदिप वै. देशमुख, विस्तार अधिकारी (पंचायत) उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. श्यामसुंदर आसाराम घुगे हे उपस्थित आहेत.

२. अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २७.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " *जगन्नाथ बंडाजी निचल यांच्या मौजा उमरी ममदाबाद येथील हे मयत झाल्यापासुन त्यांच्या जागेची नोंद ग्रा. पं. स्तरावर कशा कशा प्रकारे करण्यात आली व त्याच्या (मयत झाल्यापासुन) चे मालमत्तेच्या सर्व नोंदीची कागदपत्राची दुय्यम प्रत (प्रतिमुद्रा) Photo Copy*" मागितलेली आहे.

३. माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक २८.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "*माहिती न मिळाल्यामुळे*" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
सत्यमेव जयते

दिनांक २१.०२.२०२२ रोजी सुनावणी घेऊन "अपिलार्थी यांनी माहिती अधिकाराचे दिनांक २७.१२.२०२१ चे अर्जातील विषयाचे अनुषंगाने मागीतलेली माहिती ही जन माहिती अधिकारी सचिव ग्रामपंचायत उमरी ममदाबाद ता.दर्यापुर यांनी अपिलार्थी यांना ०८ दिवसाचे आत निशुल्क पुरविण्यात यावी असा निर्णय प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी देवुन सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे असे आदेश पारित करण्यात येत आहे." असे नमूद करुन आदेश पारीत केले.

जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, अपिलकर्ता यांना दि.१२.०३.२०२२ रोजी नमुना -८ च्या प्रती, बक्षीस पत्र तसेच खरेदीखत ची झेरॉक्स प्रत प्रदान करण्यात आली. तसेच संबंधीत व्यक्ती हे सन १९८३ मध्ये मरण पावले असून सदर जमीनीची नोंद ही त्यांच्या पत्नीचे नावाने नमुद आहे.

अपिलकर्ता यांनी असा युक्तीवाद केला की, जन माहिती अधिकारी यांचेकडून दि.१२.०३.२०२२ रोजी नमुना ८ च्या प्रती प्राप्त झाल्यात परंतु सदर नोंद ही कोणत्या कागदपत्राच्या आधारे घेण्यात आल्या याबाबत कोणतेही दस्तऐवज आपणास प्राप्त झालेली नाही केवळ आपणास नमुना ८ च्या प्रती प्रदान केल्या.

प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे तसेच जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व अपिलकर्ता यांचा युक्तीवाद लक्षात घेता, असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता यांनी त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये मय्यत जगन्नाथ बंडाजी निचल यांच्या मौजा उमरी ममदाबाद हे मय्यत झाल्यापासून त्यांच्या जागेची नोंद ग्रा. पं. स्तरावर कशा कशा प्रकारे करण्यात आली व कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे नोंद घेण्यात आली याबाबतची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी केवळ नमुना ८ च्या झेरॉक्स प्रत तसेच खरेदी खतची प्रत अपिलकर्ता यांना प्रदान केली. तसेच जी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रदान केली ती देखील २ महिन्याच्या विलंबाने प्रदान केलेली आहे मात्र सदर नोंद कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे घेण्यात आली याबातची कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे अपिलकर्ता यांनी कथन केले. यावरुन जन माहिती अधिकारी यांना सदर माहिती उपलब्ध आहे किंवा नाही याबाबतची विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती उपलब्ध नसल्याचे कथन केले. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतुदीनूसार सदर अभिलेख हे कायमस्वरुपी अभिलेख आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील तरतुदीनूसार जतन कालावधी सूचित करणारी जतन अनुसूची तयार करणे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु अशाप्रकारे कार्यालयीन अभिलेख जतन न केल्यामुळे माहिती अधिकारा अंतर्गत अपीलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध नाही त्यामूळे माहितीचे प्रदान होवू शकत नाही, ही प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती असल्याचे आज सुनावणी दरम्यान निदर्शनास आले. ही अतिशय गंभीर बाब आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**अंतरिम आदेश**

१ अपिलार्थी यांना अपूर्ण माहितीचे प्रदान झाले आहे.

२ विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना सदर नोंदी कोणत्या दस्तऐवजाच्या आधारे घेण्यात आल्या याबाबतची माहिती शोध घेवून अपिलकर्ता यांना प्रदान करावी व**

**माहिती उपलब्ध होत नसेल तर त्याबाबत सार्वजनिक प्राधिकरण तथा सचिव यांनी तसे शपथपत्र पुढील सुनावणीचे वेळी आयोगासमक्ष सादर करावा.**

३ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक०७.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

४ महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ मधील तरतुदीनूसार कार्यालयीन अभिलेख जतन न करण्याबाबत किंवा गहाळ करण्याबाबत कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नूसार कार्यवाही करण्याची शिफारस का करण्यात येवू नये याबाबतचा स्वयंस्पष्ट व लेखी खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीचे वेळी आयोगामक्ष सादर करावा.

५ विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दर्यापूर यांनी सदर फेरफार हा कोणत्या कालावधीतील आहे व तेव्हा कोणकोण सचिव म्हणुन कार्यरत होते याबाबतचा तपशील पुढील सुनावणीचे वेळी आयोगासमक्ष उपस्थित राहून सादर करावा.

६ प्रस्तुत प्रकरणात पुढील सुनावणी दि.[illegible]२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता घेण्यात येईल.

११-०९-२०२५

(रविंद्र ठाकरे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २२.०५.२०२५**

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) अपील शाखा.

जावक क्रमांक ५९३० दिनांक 0 3 SEP 2025